Indian Journal of Social Sciences and Literature Studies
ISSN 2349-5634 (Print) ISSN 2455-0973 (Online)
Vol. 7, Issue 2, October 2021

# पंडित जवाहलाल नेहरु

**प्रा.अरुण वाहुळ**
इतिहास विभाग,
विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर,
महाराष्ट्र

इतिहासकार समाजाच्या स्मृतीचा रखवालदार असतो. पण ज्या देशामध्ये रखवालदाराच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले जाते, तेव्हा इतिहास इतिहास न राहता तो मिथकाकडे मार्गक्रमण करु लागतो. सध्या आपल्या देशात अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. एकंदरीतच देशामध्ये वाचन संस्कृतीची जागा सामाजिक माध्यमांनी घेतली आहे. सामाजिक माध्यमांमध्ये येणारी माहितीच वास्तव समजून ती प्रसारीत करण्याचा पायंडा पडतो आहे. २०१४ सालापासून वास्तव इतिहासाकडे दुर्लक्ष करुन राज्यकर्त्यांनी सांगितलेल्या इतिहासालाच प्रमाण मानण्याचे काम सुरु आहे. यात प्रामुख्याने पंडित जवाहरलाल नेहरूंचा इतिहास याच पद्धतीने सांगितला जातो. ब्रिटनचा ख्यातनाम इतिहासकार अर्नोल्ड टॉयन्बी यांना भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताच्या भविष्याबद्दल विचारले असता ते म्हणाले होते कि, “जो पर्यंत पाश्चात्य देशाच्या खुल्या, उदारमतवादी राष्ट्रात शिक्षण घेऊन आलेले लोक भारताचे नेतृत्व करतील तो पर्यंत भारताचे भविष्य अत्यंत उज्ज्वल असेल. पण भारताची खरी परीक्षा तेव्हा सुरु होईल जेव्हा अस्सल भारतीय चेहरे भारताचे शासक होतील.”[१]अर्नोल्ड टॉयन्बी ही भविष्यवाणी काही प्रमाणात खरी ठरली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारताला फाळणीच्या दुःखातून बाजुला काढून एक धर्मनिरपेक्ष गणराज्याची निर्मिती भारताच्या आधुनिक संस्थापकांनी केली. त्यात पंडित जवाहलाल नेहरुंचे काम अत्यंत मोठे होते. पण आज त्यांना त्यांच्या कामाचे श्रेय देण्यास सरकार, लोक तयार नाहीत. उलट त्यांच्या कारकीर्दीवर शंका उपस्थित करुन आजचा भारत त्यांच्या नीतीमुळे बर्बाद झाला आहे, असा प्रचार संघवादी, भाजपा व इतर मंडळी करतांना दिसतात.

संघवादी आणि भाजपाचे मी समजु शकतो कारण स्वातंत्र्य चळवळीपासून अलिप्त राहिलेल्या लोकांना त्या चळवळीचे काही सोयरसुतक असणे शक्य नाही. ज्या लोकांना इतिहासामध्ये स्वतःचा नायक नसतो, ते लोक प्रस्थापित नायकाला लक्ष करुन त्या विषयी गैरसमज पसरवतात आणि स्वत: एका नायकाची निवड करुन त्यांच्यावर खुप अन्याय झाल्याचा गवगवा करत असतात. त्यांची ती राजकीय अपरिहार्यता असते. आश्चर्य तर तेव्हा होते जेव्हा सर्वसामान्य लोक त्यांच्या या प्रचारतंत्राला बळी पडतात. २०१४ नंतर पंडित नेहरु आणि सरदार पटेल यांना एकमेकांच्या विरोधात उभे करण्यात भाजपाला काही प्रमाणात यश मिळाले. पंडित नेहरुंमुळे पटेल पंतप्रधान झाले नाही. ते जर पंतप्रधान असते तर देशाची परिस्थिती वेगळी असती. पण ते हे विसरतात की नेहरु पण काँग्रेसमध्ये होते आणि पटेल ही. पटेलांना नेहरुचे नेतृत्व मान्य नसते तर त्यांनी त्यांच्या मंत्रीमंडळामध्ये काम केले नसते. पण उजव्या विचारसरणीच्या लोकांकडे नेहरुंच्या तोडीचा माणुस नसल्यामुळे त्यांनी काँग्रेसमधुन एकाची निवड त्यांच्या विरोधामध्ये केली व पटेलांना महत्व देऊन नेहरुंचे महत्व कमी करण्याचे धोरण स्वीकारले.

पंडित जवाहरलाल नेहरु १७ वर्ष देशाचे पंतप्रधान होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात काहीच केले नाही असे म्हणणारा फार मोठा वर्ग आपल्या देशात तयार झाला आहे. त्यांनी निश्चित नेहरुंच्या इतिहासाची पाने चाळावीत. २६ मे २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्ता सांभाळतांना केलेल्या भाषणामध्ये स्वत:ला पंतप्रधान नाहीत तर प्रथम सेवक म्हटले. अनेकांना हे माहित नव्हते की प्रथम सेवक हे वाक्य त्यांनी नेहरुंडून घेतले होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी रेडिओवरुन राष्ट्राच्या नावाने संदेश देतांना पंडित नेहरु म्हणाले होते, “आज आपण एक स्वतंत्र व्यक्ती आहोत, आज देश स्वतंत्र आहे. मी आज तुमच्याशी जे बोलत आहे, ते एक सरकारी व्यक्ती म्हणुन नाही तर ज्याचे खरे नाव हे असले पाहिले की मी भारतीय जनतेचा प्रथम सेवक आहे.”[२] पंडित नेहरु यांनी १७ वेळा लाल किल्ल्यावरुन भाषण केले. पण त्या एकाही भाषणामध्ये त्यांनी जनतेसाठी कोणती योजना मांडली त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला नाही. ते आपल्या भाषणातून लोकांना रागवायचे, हसवायचे, रडवायचे, त्यांना समजून सांगायचे.

आजकाल आपण पाहतो की १५ ऑगस्ट हा अत्यंत धुमधडाक्यामध्ये शाळेपासून ते लाल किल्ल्यापर्यंत साजरा होतो. खुप कंपन्या आपल्या मालाला विकण्यासाठी १५ ऑगस्ट दिनाच्या वापर करतात. त्यास बाजाराचे रूप दिले जाते. १५ ऑगस्ट १९६० साली स्वातंत्र्याच्या १३व्या

वर्धापन दिनाच्या वेळी पंडित नेहरु लोकांना रागवतात. "आज आपण येथे जमा झालो, एखादा तमाशा आहे म्हणुन नाही. आज आपण येथे जमा झालो जुन्या गोष्टी आठवण्यासाठी व भविष्याकडे पाहण्यासाठी. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले परिश्रमाने, त्यागाने, मेहनतीने पण तुम्ही समजत असाल की स्वातंत्र्य मिळाल्याने तुमचे काम संपले तर हा अत्यंत चुकीचा विचार आहे. स्वातंत्र्याची लढाई कायम सुरु असते. त्याचा शेवट कधीही होत नसतो. जेव्हा एखादा देश कमजोर होतो तेव्हा खऱ्या गोष्टी विसरुन तो छोट्या झगड्यात गुंततो त्याच वेळी त्याचे स्वातंत्र्य ढासळण्यास सुरुवात होते."[३] नेहरुंनी स्वातंत्र्य वाचविण्याचे आवाहन लोकांना केले हाते. २०१४ नंतर आपल्या देशात राष्ट्रवाद या शब्दाचा वापर प्रचंड मोठ्या प्रमाणावर सुरु झाला. सामान्यपणे राष्ट्रवाद शब्दाचा उपयोग गुलाम देशामध्ये केला जातो. स्वतंत्र राष्ट्रामध्ये राष्ट्रवादाच्या ऐवजी राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिर्माण, राष्ट्रसेवा शब्दाचा उपयोग झाला पाहिजे. राष्ट्रवाद शब्दाला उत्सवाचे रूप देण्यासाठी तीन गोष्टीचा उपयोग केला जातो. भारत माता, राष्ट्रध्वज, राष्ट्रगान. मागच्या ७० वर्षात सरकार आणि न्यायालये या तीन प्रतीकांप्रती इतके गंभीर झाले की लोकांना या गोष्टीकडे लक्ष द्यावे लागते की एखाद्या प्रतीक पुजेमध्ये कमी राहिल्यास देशद्रोही ठरले तर जाणार नाही ना?. भारत मातेचा उल्लेखाबाबत पाठीमागे खुप चर्चा रंगली होती. विशेषत: मुस्लिमांवर भारत माता की जय म्हणण्यासाठी दबाव टाकण्यात येऊ लागला. पंडित नेहरुंना या गोष्टीची कल्पना अगोदरच आलेली होती. १ मार्च १८५० रोजी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रांमध्ये ते सांगातात, "प्रत्येक वेळी भारतीय मुस्लिमांच्या इमानदारीचे पुरावे देण्यासाठी दबाव टाकणे चुकीचे आहे. इमानदारी कोणाच्या आदेशाने, भीतीने तयार होत नाही. ही काळानुसार आपोआप तयार होते.'[४] पंजाबच्या दौऱ्यावर असतांना नेहरुंच्या स्वागतामध्ये लोकांनी भारत माता की जय चा नारा दिला होता. त्यावेळी नेहरु त्यांना म्हणाले भारत माता कोण आहे? काही लोक म्हणाले जमीन हीच आमची माता आहे. काही लोक म्हणाले नदी, डोंगर, शेत या सर्वांनी मिळून भारत माता बनते. तेव्हा नेहरु म्हणाले, "या सर्व गोष्टी तुम्ही भारत माता संबंधी सांगितल्या त्या खऱ्या आहेत. पण जमिनीला, नदीला, डोंगरांना तर स्वातंत्र्य नको आहे. स्वातंत्र्य तर या जमिनीवर राहणाऱ्या व्यक्तीला पाहिजे. इंग्रजी राज्याच्या जुलमाच्या गरीबाचा सामना तर आपण भारतीय लोकच करत आहेत. जर आपणच नसलो तर या भूमिला भारत माता कोण म्हणेल? आपण जे पण काही करतो आहे ते आपण स्वातंत्र्यासाठीच करतो आहोत. त्यामुळे जेव्हा आपण भारत माता की जय म्हणतो तेव्हा आपण ३० कोटी लोकांची जय बोलत असतो. आपण सर्व जण भारत मातेचा एक-एक तुकडा आहोत. आपल्या सर्वांनी मिळून भारत माता तयार होते. तेव्हा आपण भारत माता ची

जय म्हणतो. तेव्हा आपण आपलीच जय बोलत असतो. ज्या दिवशी आपली गरीबी दूर होईल, जेव्हा आपल्या अंगावर कपडा येईल, जेव्हा आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळेल तेव्हाच आपण सर्व आनंदी होऊ, त्याच दिवशी भारत मातेचा खरा विजय होईल."[५] पंडित नेहरु जमिनीच्या एका तुकड्याला नाही तर त्यावर राहणाऱ्या लोकांना महत्व देत होते.

संघ परिवार, भाजपा व उजव्या विचारसरणीचे गट पंडित नेहरुंचा इतका राग का करतात याचे मुख्य कारण पंडित नेहरुंची धर्मनिरपेक्षबद्दल असलेली कटिबद्धता. त्यांनी कधीही भारताला धार्मिक राष्ट्रवादाकडे वाटचाल करु दिली नाही. पंतप्रधान झाल्यानंतर पंडित नेहरु एकदा रस्त्याने जात असतांना त्यांनी पाहिले की दंगेखोर लोक मुसलमानांकडून लुटलेल्या वस्तू घेऊन जात होते. जेव्हा लोकांनी नेहरुंना पाहिले तेव्हा लोकांनी महात्मा गांधी जिंदाबाद, पंडित नेहरु जिंदाबाद आणि भारत माता की जय च्या घोषणा सुरु केल्या. हे ऐकून नेहरूंनी त्या समुदायाकडे रागाने पाहिले आणि ते म्हणाले, "आपल्या हातामध्ये आपल्याच भावाचा लुटलेला माल घेऊन महात्मा गांधी आणि भारत माता की जय च्या घोषणा देतांना तुम्हाला जरा पण लाज वाटत नाही का? या घाणेरड्या हातांनी बापुच्या नावाने मुठ आवळतांना तुमचे हात थरथरत नाही क? ही वाक्य ऐकताच लोकांनी घेतलेल्या वस्तु ठेवून दिल्या व पंडित नहेरुंची माफी मागितली.[६] पंडित नेहरु म्हणाले होते, माझ्या दृष्टीने आज भारतामध्ये जर एखादी सांप्रदायिक संस्था जर कोणती असेल तर ती जनसंघ आहे.[७] दिल्ली येथे सांप्रदायिक दंग्यांच्या वेळी नेहरुंना समजले होते की लोक जामिया मिलिया उस्मानीया विद्यापीठ जाळण्यासाठी दंगेखोर जाणार आहेत. तेव्हा पंडित नेहरु जामियाच्या गेट समोर मांडी घालून जमीनीवर बसले होते. दंगेखोरांची हिम्मत झाली नाही पुढे जाण्याची. पंडित नेहरु आणि संघ यांच्यात खुप मोठा फरक होता आणि आहे. अटलबिहारी वाजपेयी यांनी भारत एक राष्ट्रपरुष या शीर्षकाखाली एक कविता लिहिली होती. खुप दिवस ती दिल्ली येथील भाजपाच्या कार्यालयाबाहेर टांगलेली होती. त्यात भारताच्या जनतेचा उल्लेख नाही, फक्त भुप्रदेशाचा आहे. संघाच्या व भाजपाच्या दृष्टीने भारत हा एक प्रदेश आहे तर नेहरुंच्या मते भारत नावाच्या भूमीवर १३० कोटी लोक राहातात. तोच खरा भारत आहे.[८]

संघाच्या आणि उजव्या विचारसरणीच्या मार्गात पंडित नेहरु उभे असल्यामुळे त्यांची हिंदू राष्ट्राचे स्वप्न कधी पूर्ण झाले नाही. म्हणुन त्याविषयी इतका तिरस्कार दाखवला जातो. पण आजच्या भाजपावाल्यांनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे नेहरुंच्या निधनानंतरचे शोक प्रस्तावावरील भाषण अवश्य वाचावे. २७ मे १९६४ साली सकाळी ६:२० वाजता पंडित नेहरू चे

निधन झाले. २९ मे १९६४ रोजी जनसंघाचे युवा नेते अटल बिहारी वाजपेयी शोक प्रस्तावावर संसदेत भाषण करताना ते म्हणाले, "अध्यक्ष महोदय एक स्वप्न होते जे अपूर्ण राहिले, एक गीत होते जे मुके झाले, एक वात होती जी अनंतात विलिन झाली. एक स्वप्न होते अशा संसाराचे जे भय आणि भुख विरहीत असेल. गीत होते अशा महाकाव्याचे ज्यामध्ये गीतेचा स्वर आणि गुलाबाचा सुगंध होता. वात होती अशा दीपकाची जी रात्रभर जळत राहिली, जो अंधरासोबत लढत होता आणि आपल्याला मार्ग दाखवून एका सकाळी निर्वाणाला प्राप्त झाला. मृत्यु ध्रुव आहे, शरीर नश्वर आहे. काल आपण ज्या कायेस चंदनाच्या चितेवर ठेवून आलो त्याचा नाश निश्चित होता. पण हे काय गरजेजे होते की मृत्यु इतका लपून छपुन यावा? जेव्हा सखे-सोयरे झोपले होते, जेव्हा पहारेदार बेखबर होते. तेव्हा आमच्या जीवनामधील एक अमूल्य निधी लुटली गेली. भारत माता आज शोकमग्न आहे. तिचा सर्वात लाडका राजकुमार हरवला आहे. मानवता आज खिन्न आहे. तिचा पुजारी कायमचा झोपला आहे. शांती आज अशांत आहे, तिचा रक्षक निघून गेला आहे. दलितांचा सहारा गेला, जन-जनच्या डोळ्यांचा तारा तुटला, जगाच्या रंगमंचावरील प्रमुख अभिनेता आपला अंतिम अभिनय दाखवून अंतर्ध्यान झाला."[९] अटलजीच्या या भाषणातून हेच अधोरेखित होते कि वैचारिक मतभेद आपल्या जागेवर असतात पण त्या व्यक्तीला त्याच्या वाट्याचे मोठेपण दिले पाहिजे.

संदर्भ:


१) एस गोपाल, जवाहरलाल नेहरू ए बायोग्राफी,ऑक्सफोर्ड,२००३, पृ ६.

२) उपरोक्त

३) पुरुषोत्तम अग्रवाल, कौन है भारतमाता, राजकमल प्रकाशन, २०२१, पृ १०

४) उपरोक्त .

५) पीयूष बबेले, नेहरू मिथक और सत्य, संवाद प्रकाशन, २०१९, पृ. ४०.

६) उपरोक्त ५१.

७) उपरोक्त

८) उपरोक्त, ६७.

९) उपरोक्त, पृ ४३०